प्रकरण पहिले

इतिहास, अभ्यासाची उद्दिष्टे व अभ्यासाची पध्दती

प्रकरण पहिले

इतिहास, अभ्यासाची उद्दिष्टये व अभ्यासाची पध्दती

१.१ प्रस्तावना

१.२ सहकारी चळवळीचा आढावा

१.३ स्वातंत्र्यपूर्व काळातील सहकारी चळवळीचा विकास

१.४ स्वातंत्र्योत्तर काळातील सहकारी चळवळीचा विकास

१.५ अभ्यासाची उद्दिष्टये

१.६ अभ्यासाची पध्दती

१.७ अभ्यासाची व्याप्ती

१.८ मूल्यमापन

प्रकरण पहिले

इतिहास, अभ्यासाची उद्दिष्टये व अभ्यासाची पध्दती

१.१ प्रस्तावना :

या प्रकरणात सहकारी चळवळीचा थोडक्यात आढावा घेतला आहे. सहकारी चळवळीचा आढावा घेताना भारतातील आणि त्याबरोबरच महाराष्ट्रातील सहकारी चळवळीच्या विकासाचा थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. प्रामुख्याने सहकारी चळवळ ज्या दुर्बल घटकांसाठी सुरू झाली त्या दुर्बल घटकांच्या संदर्भात वाळवा तालुका कारागिर विकास संघाद्वारे केलेल्या कार्याची भूमिका विशद करण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रकरणात " वाळवा तालुका कारागिर विकास ग्रामोद्योग संघ, मर्यादित, इस्लामपूर - एक अभ्यास " या विषयाची अभ्यासपध्दती व अभ्यासाची उद्दिष्टये स्पष्ट केलेली आहेत.

१.२ सहकारी चळवळीचा आढावा :

सहकारी चळवळ ही विश्वव्यापी चळवळ आहे असे म्हटले जाते. सुमारे १५० वर्षे अस्तित्वात असलेली सहकारी चळवळ आता जगात सर्वत्र पसरली आहे. सहकारी चळवळीचा विकास हा मानवजाती इतकाच प्राचीन आहे. कारण दैनंदिन अडीअडचणीवर मात करण्याच्या दृष्टीने मानवांनी परस्परांना सहकार्य केल्याचे अनेक ठिकाणी अनुभवास आले आहे. सहकारी चळवळीचा जागतिक पातळीवर विचार केल्यास सहकाराचा जन्म प्रथमत: इंग्लंडमध्ये झाला आहे. त्यानंतर सहकाराचा विकास जर्मनी, डेन्मार्क, रशिया, इस्त्राएल, भारत इ. देशात वाढत गेल्याचे दिसून येते. भारतातील सहकारी चळवळीच्या उगमाच्या विकासाचा इतिहासाचा शोध घेतला असता असे दिसून येते की, जगातील इतर देशाप्रमाणे भारतातील सहकारी चळवळीचा प्रारंभ ग्रामीण भागातील जनतेच्या दारिद्र्यातून व पिळवणूकीतून झाला आहे.

१७६० ते १८६० या काळात इंग्लंडमध्ये जी औद्योगिक क्रांती झाली तिचे दुष्परिणाम भारतातील ग्रामीण भागात चालणाऱ्या लघु व कुटिरोद्योगावर झाले. इंग्लंडमधून भारतात येणाऱ्या मालाने भारतातील लघु व कुटिरोद्योग बंद पडले व अनेक कामगारावर बेकारीची कुऱ्हाड कोसळली. या बेकार झालेल्या कामगारांनी उदरनिर्वाहासाठी शेती व्यवसायाचा आधार घेतला. परिणामत: शेती वरील लोकसंख्येचा भार वाढला. परंतु शेतकऱ्यांची स्थिती या काळात अगोदर हलाखीची होती. त्यांना कर्ज पुरवठा करणेसाठी सहकारी संस्था अस्तित्वात नव्हत्या. त्यामुळे शेतकऱ्यांनी कर्जासाठी सावकारांचा आधार घेतला, सावकाराकडून शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध होऊ लागले परंतु व्याजाचा दर हा जास्त असल्याने अनेक शेतकऱ्यांना आपल्या जमिनी गमवाव्या लागल्या. एकंदरीत या काळात शेतकरी वर्ग सावकारी पाशात अडकला होता. त्यांचे जीवन गुलामीच्या पातळीवर येऊन पोहोचले होते. त्यामुळे सर डॅनियल हॅमिल्टन म्हणतात की, ' कृषीप्रधान भारत हा महाजनांच्या विळख्यात सापडला होता.'

१८७५ मध्ये भारतात सावकारशाही विरुध्द बंड झाले. महाराष्ट्रात पुणे व नगर या जिल्हातील शेतकऱ्यांनी सावकारशाही विरुध्द दंगे केले. त्यांनी सावकारांची घरे जाळण्याचा प्रयत्न केला. सावकारांनी कर्ज देतेवेळी लिहून दिलेल्या वचनचिठ्या एकत्र करून फाडण्यात आल्या. सावकारांच्या विरुध्द इत्यादी अनेक प्रकार केलेमुळे शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे सरकारचे लक्ष वेधले गेले. सरकारने शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी आणि शेती-विषयक गरजा भागविण्यासाठी १८७९ मध्ये डेक्कन ॲग्रिकल्चरल रिलीफ ॲक्ट, १८८३ मध्ये भूमी सुधारणा कायदा व १८८४ मध्ये शेती कर्ज कायदा असे तीन कायदे केले. १८८२ मध्ये मद्रास सरकारने फ्रेडरिक निकल्सन यांना युरोपातील सहकारी चळवळीचा अभ्यास करून राज्यात शेतीला मदत करण्यासाठी सहकारी तत्वावर बँका स्थापन करण्याच्या शक्यतेबाबत सूचना करण्यास सांगितले. याच काळात सर विल्यम वेडरबर्न व न्यायमूर्ती रानडे यांनी शेती बँकाची स्थापना करण्याची योजना आखली होती.

१८९९ मध्ये फ्रेडरिक निकोल्सन यांनी भारतात जर्मनीच्या धर्तीवर रफायझान पध्दतीच्या ग्रामीण सहकारी पतपेढया स्थापन करण्याची शिफारस केली. याचवेळी उत्तरप्रदेश व मद्रासमध्ये शेतकरी वर्गास आर्थिक मदत करणेसाठी २०० सहकारी संस्था व निधी अस्तित्वात आले होते. १९०० मध्ये भारत सरकारने सर एडवर्ड लॉ यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली व या समितीने सहकारी संस्थांची स्थापना करण्यासाठी आग्रहाने शिफारस केली. ग्रामीण आणि नागरी भागातील दुर्बल व कर्जबाजारी व्यक्तींना कर्ज पुरवठा करण्याकरिता जर्मनीतील रफायझान पध्दतीच्या सहकारी कर्ज पुरवठा संस्था स्थापन करणे योग्य ठरेल असा निष्कर्ष या समितीने निकोल्सन व डयूपरनेक्स या दोन्ही योजनांचा विचार करून काढला होता. नागरी व सहकारी संस्थांच्या स्थापनेसाठी ' एक नमुना योजना ' तयार केली होती. त्याच दरम्यान शेतक-यांच्या आर्थिक परिस्थितीची पाहणी १९०१ च्या दुष्काळ समितीने आपल्या अहवालात असे स्पष्ट केले होते की ⅔ शेतक-यांच्या जमिनी सावकारांनी ताब्यात घेतल्या असून ८० टक्के शेतकरी कमी अधिक प्रमाणात कर्जबाजारी आहेत.

सर एडवर्ड लॉ यांनी भारतात जर्मनीमधील रफायझान पध्दतीच्या सहकारी पतपुरवठा संस्था ' स्थापन करण्याची शिफारस केली. त्यांनी केलेल्या ' नमुना योजना ' नुसार १९०४ मध्ये ' भारतीय सहकारी संस्था कायदा ' अंमलात आणला. अशाप्रकारे भारतात १९०४ नंतर या कायद्याने सहकारी चळवळीच्या विकासाची मुहूर्तमेढ रोवली गेली. प्रा. हेन्री वुल्फ यांनी या कायद्याचे ' आर्थिक आणि सामाजिक इतिहासाला वळण लावणारा कायदा ' असे वर्णन केले आहे. ' दारिद्र्याकडून समृध्दीकडे नेणारा एक महत्वाचा मार्ग ' असे प्रा. हॅमिल्टन यांनी वर्णन केले आहे.

१.३ स्वातंत्र्यपूर्व काळातील सहकारी चळवळीचा विकास :

भारतात स्वातंत्र्यपूर्वकाळातील सहकारी चळवळीच्या विकासाचा अभ्यास पुढीलप्रमाणे वेगवेगळ्या टप्प्यातून विशद केला आहे.

१) १९०४ ते १९१२ -

भारतातील सहकारी चळवळीच्या विकासातील पहिला कायदा १९०४ मध्ये केला गेला. शेतकरी, कारागिर व मर्यादित उत्पन्न असलेल्या व्यक्तींमध्ये बचत, स्वावलंबन व सहकार्याची भावना वाढीस लावून त्यांना दारिद्र्यातून संपन्नतेकडे नेण्याचा प्रयत्न करणे हा या कायद्याचा प्रमुख उद्देश होता. १९०४ च्या कायद्याने सहकारी चळवळीचा पाया घालण्याचे कार्य केले आहे. भारतातील लोकांना सहकारी चळवळ नवीन असून व बहुतेक लोक अशिक्षित असूनही १९१२ पर्यन्त सहकारी संस्थांच्या कार्यकारी मांडवलात नऊ पटीने वाढ झाली. मात्र हा कायदा सहकारी संस्थांच्या संख्येच्यादृष्टीने अपुरा वाटू लागला व कर्जपुरवठा करणाऱ्या सहकारी संस्थांना आर्थिक मदत करण्याकरिता मध्यवर्ती सहकारी संस्थांच्या स्थापनेची तरतूद नसल्यामुळे १९१२ मध्ये नवीन सहकारी कायदा केला.

२) १९१२ ते १९१९ -

सहकारी चळवळीच्या विकासातील वेगवान विस्ताराचा काळ या नावाने दुसरा टप्पा ओळखला जातो. १९१२ मध्ये जो नवीन कायदा करण्यात आला त्यामध्ये १९०४ च्या कायद्यातील तरतुदीबरोबरच मध्यवर्ती सहकारी बँकेच्या स्थापनेची तरतूद केली गेली. या काळात सहकारी संस्थांचा विकास वेगाने झाला. १९१४ मध्ये सर एडवर्ड मॅक्लेगन यांच्या अध्यक्षतेखाली सहकारी संस्थांचा अभ्यास करण्यासाठी एक समिती नेमली. या समितीने आर्थिकदृष्टया कमकुवत घटकास सभासदत्व दिलेले नव्हते, अनेक व्यवस्थापक, सभासद अशिक्षित होते हे दोष दाखवून दिले. त्याचबरोबर सहकारी संस्थांची रचना, कार्य-पध्दती, कार्यक्षेत्र, हिशेब तपासणी इत्यादी संदर्भात शिफारशी करण्याचे कार्य या समितीने केले मात्र त्या शिफारशी अंमलात आल्या नाहीत.

३) १९१९ ते १९२९ -

सहकारी चळवळीच्या विकासातील हा तिसरा टप्पा ' अनियोजित विस्ताराचा काळ ' म्हणून ओळखला जातो. १९१९ पर्यन्त

सहकार हा विषय केंद्र सरकारच्या क्षेत्रात होता परंतु १९१९ च्या कायद्याने सहकार हा विषय राज्य सरकारकडे सोपविण्यात आला. हा कायदा दुस-या महायुध्दाच्या समाप्तीनंतर असल्यामुळे देशात वस्तूंची टंचाई, वाढती किंमत पातळी इ. दोष किंवा समस्यांना सामोरे जावे लागले. या काळात सहकारी संस्थांची संख्या वाढलेली असली तरी ती योग्य दिशेने झाली नव्हती. सरकारने कर्ज देतांना सहकारी संस्थांच्या कर्ज अटींचा विचार केला नाही. त्यामुळे सहकारी संस्थांची गुणात्मक प्रगती झाली नाही म्हणूनच या काळास ' अनियोजित विकासाचा काळ ' असे म्हटले जाते.

४) १९२९ ते २९३९ -

सहकारी चळवळीच्या विकासातील हा टप्पा ' एकत्रीकरण व पुनर्रचनेचा काळ ' म्हणून ओळखला जातो. १९२९ च्या जागतिक महामंदीने शेतमालाच्या किंमती कमी झाल्याने शेतक-यांची परिस्थिती हलाखीची झाली. कर्जांची थकबाकी सहकारी संस्थातून त्यामुळे वाढत गेली. त्यामुळे बिहार व आसाम राज्यात काही सहकारी संस्था बंद करण्यात आल्या. त्यामुळे सहकारी चळवळ कोलमडली गेली. या काळात सहकारी चळवळीची अधोगती झाल्याने त्यांची संख्या कमी झाली. या काळात सहकारी संस्थांची संख्या कमी होणारी पहिली घटना सहकारी चळवळीच्या इतिहासात झाली. या काळात कर्ज सभासदांना देतेवेळी कर्जदाराची कुवत, कर्ज वसुली इ. घटकाकडे लक्ष देण्याचे विशेष कार्य केले. त्याच बरोबर राज्य सरकार, मध्यवर्ती बँक यांचेकडून या संस्थांना आर्थिक मदत झाली.

५) १९३९ ते १९४६ -

सहकारी चळवळीच्या विकासातील व स्वातंत्र्यपूर्व काळातील हा पाचवा व शेवटचा टप्पा ' पुनर्विकासाचा काळ ' म्हणून ओळखला जातो. १९३९ ते १९४५ या काळातील दुस-या महायुध्दामुळे सहकारी चळवळीचा विकास वेगाने झाला. सहकारी संस्थांची संख्या, सभासद, कार्यकारी मंडळ इ.मध्ये वाढ झाली. त्यामुळेच या टप्प्यास पुनर्विकासाचा काळ असे म्हटले जाते.

१.४ स्वातंत्र्योत्तर काळातील सहकारी चळवळीचा विकास :

१९४७ नंतर भारतात सहकारी चळवळीचा विकास वेगाने झाला. शेतक-यांना कर्ज पुरवठा करण्याबरोबरच शेतीस आवश्यक असणा-या खतांचा व बी-बियाणे आणि रासायनिक प्रक्रियांचा पुरवठा होणे आवश्यक असल्याचे मत अनेक तज्ञांनी मांडले व त्यानुसार अनेक बहुउद्देशीय सहकारी संस्था अस्तित्वात आल्या व त्यांनी या कार्याची पूर्तता केली. बहुउद्देशीय सहकारी संस्थांच्या कार्याची उपयुक्तता लक्षात घेऊन १९४७ मध्ये रिझर्व्ह बँकेने अशा संस्था स्वतंत्र स्थापन करण्याची शिफारस केली.

ग्रामीण भागातील आर्थिकदृष्टया दुर्बल असणा-या घटकांचा विकास करण्याच्या दृष्टिकोनातून सरकारकडून १९५१ मध्ये श्री.ए.डी.गोरवाला यांच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पाहणी समिती नेमली. या समितीने आपला अहवाल १९५३-५४ मध्ये सादर केला. समितीने केलेल्या शिफारशी सहकारी चळवळीच्या विकासाच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्वाच्या होत्या. ग्रामीण भागातील शेतक-यांना जो कर्जपुरवठा होत होता तो अनेक मार्गांनी होत असला तरी त्यामध्ये सावकाराकडून होत असलेला कर्जपुरवठा हा सर्वात जास्त होता. त्यांचे व्याजाचे दर जास्त असल्याने शेतक-यांना त्यांच्या कर्जातून बाहेर पडणे अशक्य होत असे. सावकारांना मोठया प्रमाणात पर्याय म्हणून सहकारी संस्थांची वाढ होणे अत्यंत गरजेचे होते असे गोरवाला समितीने स्पष्ट केले.

स्वातंत्र्योत्तर काळात भारतात सहकारी चळवळ हा आर्थिक विकासाचा मंत्र समजला गेला. ग्रामीण भागातील आर्थिकदृष्टया दुर्बल असणा-या घटकांना पतपुरवठा करण्यासाठी अनेक क्षेत्रात सहकारी संस्था स्थापन झाल्या. सहकारी चळवळीतील अनेक संस्थांपैकी खादी व ग्रामोद्योग मंडळ ही एक मोठी व महत्वपूर्ण सहकारी संस्था आहे. या संस्थेची स्थापना

खादी आणि ग्रामोद्योग विकास कायदा, १९५६ नुसार करण्यात आली. मात्र १९५७ पासून आयोगाचे कार्य सुरू झाले. महाराष्ट्रात १९६२ मध्ये खादी व ग्रामोद्योग मंडळाची स्थापना झाली. महाराष्ट्रातील बारा बलुतेदारांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी या मंडळाने जिल्हा व तालुका पातळीवर अनेक सहकारी संस्था स्थापन केल्या. महाराष्ट्रात असे २९६ गट स्थापन झाले असून सांगली जिल्हात प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी असे एकूण आठ संघ ३१ जुलै, १९७२ रोजी स्थापन झाले आहेत. वाळवा तालुका कारागिर विकास संघ त्यापैकीच एक आहे. प्रबंधाचा विषय याच संघाशी निगडीत असून त्या संघाच्या अभ्यासाची उद्दिष्टये पुढीलप्रमाणे विशद केली आहेत.

१.५ <u>अभ्यासाची उद्दिष्टये</u> :

सहकारी चळवळीची सुरुवात ही मुलत: दुर्बल घटकासाठी आणि त्यांच्या उध्दारासाठी झालेली आहे. म्हणून प्रबंधाचा विषय निवडताना सहकारी चळवळीत दुर्बल घटक डावलला गेल्यामुळे आम्ही तालुका पातळीवरील ' वाळवा तालुका कारागिर विकास ग्रामोद्योग संघ मर्यादित, इस्लामपूर - एक अभ्यास ' हा विषय प्रबंधाचा अभ्यास विषय म्हणून निवडला आहे. त्या अभ्यास विषयाची तालुका पातळीवरील सुरुवात ही ३१ जुलै, १९७२ पासून झाली. अभ्यासाची व्याप्ती १९७२ ते १९९२ अशी २० वर्षांच्या काळातील आहे. त्यासाठीची अभ्यास उद्दिष्टये म्हणून सर्वसामान्यपणे पुढील उद्दिष्टये सांगता येतील :

१) ' वाळवा तालुका कारागिर विकास (विविध कार्यकारी सहकारी) ग्रामोद्योग संघ मर्यादित, इस्लामपूर - एक अभ्यास ' या संघाचा सर्वसाधारण अभ्यास करणे.

२) १९७२ ते १९९२ या वीस वर्षांच्या काळातील वाळवा तालुका कारागिर विकास ग्रामोद्योग संघाने दिलेली कर्जे आणि कर्जाची रचना यांचा अभ्यास करणे.

३) या संघाकडून ज्यांनी कर्ज घेतले आहे त्यांनी तयार केलेल्या वस्तूंची विपणन व्यवस्था अभ्यासणे.

४) अभ्यासाच्या कालखंडात जी सबसीडी (द्रव्यसाहाय्य) दिली गेली आहे तिचा अभ्यास करणे.

५) संघाकडून दिली गेलेली कर्जे, त्यांची परतफेड आणि असल्यास थकबाकीचा विचार करणे.

१.६ <u>अभ्यासाची पध्दती</u> :

हा विशिष्ट प्रकारचा अभ्यास करताना तो कोणत्या कालावधीशी निगडीत आहे, माहिती गोळा करण्याच्या कोणकोणत्या पध्दती आहेत या विषयी अभ्यास केला जाईल. हा अभ्यास पूर्णपणे वाळवा तालुका कारागिर विकास ग्रामोद्योग संघाच्या कार्यालयीन माहितीवरून आणि सचिवांच्या बरोबर केलेल्या प्रत्यक्ष चर्चेवरून गोळा केलेला आहे. संघाचे छापील अहवाल हे सांख्यिकीय माहिती मिळविण्यास उपयुक्त ठरले. हा अभ्यास करीत असताना संपूर्ण माहिती दुय्यम स्वरूपाची माहिती या स्वरूपाची असेल. वाळवा तालुका कारागिर विकास ग्रामोद्योग संघाच्या सुरुवातीपासून म्हणजे १९७२ पासून १९९२ पर्यन्त त्याची प्रगती पाहणे, कर्ज वाटप, कर्ज वसूली, थकबाकी यांचे विश्लेषण करणे हा प्रमुख उद्देश असेल. माहितीचे संकलन करताना त्यात उद्योगांचे प्रकार, त्या त्या उद्योजकांना केलेले कर्ज वाटप, त्यांच्याकडून झालेली कर्ज वसूली, त्यांना दिलेले द्रव्यसाहाय्य (सबसीडी) यांचा अभ्यास केला जाईल. कर्ज वाटपात कर्ज वसूली, दरवर्षी झालेले बदल याचाही विचार केला जाईल. प्रत्येक उद्योगाला दिलेले कर्ज, त्याचा एकूण कर्जातील सहभाग याचेशी संबंधित असेल. महत्वाची बाब म्हणजे संघ नुसताच कर्ज पुरवठा करीत नाही तर केलेल्या कर्ज पुरवठयातून वेगवेगळ्या उद्योजकांकडून जे जे वस्तूचे उत्पादन केले जाते त्या उत्पादनाची विक्री करण्याचा प्रयत्न संघाकडून केला जातो. थोडक्यात ग्रामीण विकासाचे साधन म्हणून सहकारी चळवळीतील संघाची भूमिका ही कशी महत्वपूर्ण आहे याचा तपशील मांडला जाईल.

१.७ अभ्यासाची व्याप्ती :

या अभ्यासाची व्याप्ती प्रामुख्याने ' वाळवा तालुका कारागिर विकास (विविध कार्यकारी सहकारी) ग्रामोद्योग संघ मर्यादित, इस्लामपूर ' या संस्थेशी निगडीत आहे. संघाचा नोकरवर्ग, कर्जवाटप, कर्जवसूली, थकबाकी, विक्री व विक्री व्यवस्था यांचेशी निगडीत आहे. १९७२ पासून १९९२ पर्यन्तचा कालखंड अभ्यासासाठी निवडला आहे. या कालखंडात निर्धारित केलेली उद्दिष्टये तपासून पाहणे व त्याच्या आधारे निष्कर्ष काढणे ही अभ्यासाची व्याप्ती राहील. अभ्यासानंतर जे दोष किंवा उणिवा अभ्यासाच्या मर्यादा निदर्शनास आणण्याचा प्रयत्न केला जाईल. शक्यतो ते दोष कमी करण्याविषयी उपाययोजनांचा ऊहापोह केला जाईल.

१.८ मूल्यमापन :

हे प्रकरण अभ्यासाची उद्दिष्टये आणि अभ्यासाची पध्दती यांचेशी निगडीत आहे. या प्रकरण दोनमध्ये सर्वात प्रथम ' वाळवा तालुका कारागिर विकास (विविध कार्यकारी सहकारी) ग्रामोद्योग संघ मर्यादित, इस्लामपूर ' या संघाचा जो अभ्यास करावयाचा आहे त्या विषयीची उद्दिष्टये सांगितली आहेत. यामध्ये अभ्यासाचा कालखंड, उद्योगवार कर्जवाटप, कर्जवसूली, द्रव्यसाहाय्य, येणेबाकी, थकबाकी अशा बाबींचा समावेश आहे. त्याचप्रमाणे हा अभ्यास कोणत्या प्रकारे करता येईल, माहिती गोळा करण्याचे मार्ग, अभ्यासाचा कालावधी (१९७२ ते १९९२) या विषयी विचार केला आहे. थोडक्यात हे प्रकरण अभ्यासाची उद्दिष्टये आणि व्याप्ती यांच्याशी निगडीत आहे.

संदर्भ

१) Mathur B.S. - Cooperation in India, Sahitya Bhawan, Agra, 1988.

२) जोशी सी.जे. - सहकार : तत्वे आणि व्यवहार, फडके बुकसेलर्स, कोल्हापूर - १९९१-९२.

३) सराफ मोहन - सहकार, सी. जमनादास आणि कंपनी, मुंबई, १९८९.